पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १८**

**सभावृत्तांत**

दिनांक : **०७/०७/२०१६** वेळ : दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०७/०७/२०१६** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर - सभापती**
२. मा.ओव्हाळ शेखर अशोक
३. मा.तानाजी विठ्ठल खाडे
४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
५. मा.आसवाणी सविता धनराज

या शिवाय मा.गावडे – सह आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.दुरगुडे - सहाय्यक आयुक्त, मा.बेंडे – प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये समाविष्ट करणेत आला.**

विषय क्र.१) महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१६ - १७ आयोजित करणेबाबत.

विषय क्र.२) महापौर चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धा २०१६ - १७ ( महिला व पुरुष ) आयोजित करणेबाबत.

विषय क्र.३) शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१६ - १७ आयोजित करणेबाबत.

विषय क्र.४) सांस्कृतिक व कला धोरणांतर्गत आयोजित करावयाच्या कार्यक्रमांबाबत – मा.अरुण बो-हाडे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) लांडेवाडी भोसरी गणपती मंदिर येथील व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.तानाजी खाडे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) मनपाची धावडेवस्ती व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.तानाजी खाडे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) मनपाची साई शारदा महिला व्यायामशाळा, कासारवाडी सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.तानाजी खाडे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) मनपाची पुनावळे येथील व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.तानाजी खाडे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.अरुण बो-हाडे

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची सभा सोमवार दि. **११/०७/२०१६** रोजी दुपारी **२.००** वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती -** सोमवार दि. **११/०७/२०१६** रोजी दुपारी **२.००** वा. पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **मासुळकर समीर मोरेश्वर** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १८**

**सभावृत्तांत**

( दिनांक ०७/०७/२०१६ ची तहकूब सभा )

दिनांक : **११/०७/२०१६** वेळ : दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दि.**०७/०७/२०१६** ची तहकूब सभा सोमवार दिनांक **११/०७/२०१६** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर - सभापती**
२. मा.जावेद रमजान शेख
३. मा.ओव्हाळ शेखर अशोक
४. मा.ननवरे जितेंद्र बाबा
५. मा.तानाजी विठ्ठल खाडे

या शिवाय मा.गावडे – सह आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.दुरगुडे - सहाय्यक आयुक्त, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक **१५/०६/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १७ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक – ५९ विषय क्रमांक – ०१
दिनांक - ११/०७/२०१६ विभाग – क्रीडा विभाग
सुचक : मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा.तानाजी खाडे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/४१२/२०१६, दि.०१/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, पुणे जिल्हा कॅरम असोसिएशन यांच्या मान्यतेने व नव प्रगती मित्र मंडळ, इंदिरानगर, चिंचवड, पुणे ४११ ०३३ यांच्या सहकार्याने दि.२९ ते ३१ जुलै २०१६ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत पिंपरी चिंचवड म.न.पा.चे कै.सौ.मनीषा भोईर विरंगुळा केंद्र, प्रेमलोक पार्क चिंचवड पुणे ४११ ०३३ येथे महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१६-१७ ( पुरुष, महिला गट व जेष्ठ नागरिक गट ) आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे **र.रु.३,६४,१६०/-** चे खर्चास अथवा अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मा.स्थायी समिती सभेची

मान्यता घेणेस सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च **र.रु.५०,०००/-** हा संबंधित प्रभाग स्थापत्य विभाग व विद्युत विषयक खर्च **र.रु.२०,०००/-** हा संबंधित प्रभाग विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल व उर्वरीत **र.रू.२,९४,१६०/-** हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल. तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई पंच व खेळाडू यांकरिता चहा व अल्पोपहार इ. निविदा पध्दतीने अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करून करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६० विषय क्रमांक – ०२
दिनांक - ११/०७/२०१६ विभाग – क्रीडा विभाग
सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.जितेंद्र ननवरे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/२९३/२०१६, दि.०४/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, महाराष्ट्र राज्य कबड्डी असो., पुणे जिल्हा कबड्डी असो. यांचे मान्यतेने, जय गणेश युवा फाउंडेशन, विनायक नगर, बो-हाडेवाडी मोशी, पुणे ४१२ १०५ यांच्या सहकार्याने, पावसाळा संपल्यानंतर ऑक्टोंबर/नोव्हेंबर २०१६ या काळात विनायक नगर, बो-हाडेवाडी मोशी, पुणे ४१२ १०५ येथे **महापौर चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धा २०१६-१७ (महिला व पुरुष)** आयोजित करणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद केले प्रमाणे येणा-या अंदाजे एकूण **र.रू.३०,०१,७६४/-** चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदरच्या खर्चातील स्थापत्य विषयक खर्च **र.रू.६,६८,०००/-** हा स्थापत्य विभाग, संबंधित प्रभाग व विद्युत विषयक खर्च **र.रू.२,००,०००/-** हा खर्च विद्युत विभाग, संबंधित प्रभाग यांचे लेखा शिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च **र.रू.२१,३३,७६४/-** क्रीडा विभागाचे, " महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा " या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस तसेच स्पर्धा अनुषंगाने मेडल्स, ट्रॉफीज, सन्मान चिन्हे, फ्लेक्स बॅनर, फक्की कोटेशन नोटीस प्रसिद्ध करून खरेदी करणेस व प्रमाणपत्रे, निमंत्रण पत्रिका ई.भांडार विभागाकडून करून घेणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६१ विषय क्रमांक – ०३
दिनांक - ११/०७/२०१६ विभाग – क्रीडा विभाग
सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.जितेंद्र ननवरे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/४१८/२०१६, दि.०५/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१६-१७ आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर, पंच मानधन, पंच चहा अल्पोपहार खर्च, नारळ, बुके, पूजा खर्च, स्टेशनरी

खर्च, फक्की, क्रीडा साहित्य खरेदी कोटेशन/निविदा पद्धतीने करणे, स्पर्धा आयोजन सभा चहापान, साहित्य भाडेपोटी खर्च, प्रेक्षागृह भाडे इतर खर्च इ., जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांचे दि.१६/९/२०१५ चे इतिवृत्तामध्ये मंजूर केलेप्रमाणे, जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१६-१७ पासून म.न.पा.कडून प्रति दिन पंच मानधन र.रु.२५०/-व त्यांना प्रति दिन दोन वेळेचा चहा व अल्पोपहार करिता र.रु.५०/-असे प्रतिदिन प्रतीपंच मानधन र.रू.३००/- खर्च मंजूर करणेस, सन २०१६-१७ सन २०१६-१७ मध्ये विभागस्तर स्पर्धेसाठी म.न.पा. शाळेतील अंदाजे ३०० विद्यार्थी खेळाडू व राज्य पातळीवर १५०, राष्ट्रीय पातळीवर ५० व संघटने मार्फत आयोजित क्रीडा स्पर्धेसाठी ५० शालेय खेळाडू, त्यांचे समवेत जाणारे क्रीडा शिक्षक व व्यवस्थापक यांचे प्रवास खर्च, दैनिक भत्ता, प्रवेश फी औषध खर्च इ.अदा करणे कामी अंदाजे र.रु.१,५०,०००/- असे एकूण येणा-या संभाव्य खर्च र.रु.१३,७९,९५०/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१६-१७ अनुषंगाने येणारा खर्च हा क्रीडा निधी - वार्षिक क्रीडा स्पर्धा व क्रीडा कला साहित्य या लेखाशिर्षावर केलेल्या एकूण तरतूद र.रु.४०,००,०००/- मधून खर्ची टाकणेस तसेच शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१६-१७ अनुषंगाने मंडप, बैठक व्यवस्था, मैदान तयार करणे, ध्वनी/विद्युत व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे इ. स्परुपाचा खर्च हा क्षेत्रीय कार्यालयामार्फत होणार आहे. त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च संबंधित विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांच्या अंदाजपत्रकातुन खर्ची टाकण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६२ विषय क्रमांक – ०४

दिनांक - ११/०७/२०१६

सुचक : मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा.तानाजी खाडे

संदर्भ : मा.अरुण बो-हाडे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड शहराचे सांस्कृतिक व कला धोरणामध्ये अंतर्भाव असल्याप्रमाणे उदा. आदिवासी सांस्कृतिक महोत्सव, धनगरी ढोल व नृत्य, सुगम संगीत स्पर्धा, नृत्यावर आधारीत कार्यक्रम, कवी संमेलन, मराठी राजभाषादिन, सायन्स डे व परंपरा महोत्सव, वक्तृत्व स्पर्धा, महिला महोत्सव, विज्ञान महोत्सव, नाटय अभिनय, नाटयस्पर्धा, एकांकिका स्पर्धा, स्वरसागर संगीत महोत्सव, पुणे आंतरराष्ट्रीय महोत्सव, आंतर महाविद्यालयीन स्पर्धा/महोत्सव, आंतरशालेय स्पर्धा/महोत्सव सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात व यापुढे दरवर्षी आयोजित करणेस तसेच पिंपरी चिंचवड मनपाच्यावतीने गणेशोत्सव २०१६ या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी १८ येथे १० दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास् मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६३ विषय क्रमांक – ०५

दिनांक - ११/०७/२०१६

सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.जितेंद्र ननवरे

संदर्भ : मा.तानाजी खाडे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड मनपाच्यावतीने प्रभाग क्र.३६ लांडेवाडी भोसरी गणपती मंदिर येथे लांडेवाडी भोसरी व्यायामशाळा चालविली जाते. नव महाराष्ट्र तरुण मित्रमंडळ, लांडेवाडी भोसरी पुणे यांनी मनपा प्रभाग क्र.३६ लांडेवाडी भोसरी गणपती मंदिर येथे लांडेवाडी भोसरी व्यायामशाळा ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत मागणी केलेली आहे. मनपाची प्रभाग क्र.३६ लांडेवाडी भोसरी गणपती मंदिर येथील व्यायामशाळा नव महाराष्ट्र तरुण मित्रमंडळ, लांडेवाडी भोसरी पुणे यांना ११ महिने कराराने दर महा र.रु.२,०००/- मनपाकडून सेवाशुल्क देऊन सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६४ विषय क्रमांक – ०६

दिनांक - ११/०७/२०१६

सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.जितेंद्र ननवरे

संदर्भ : मा.तानाजी खाडे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने धावडेवस्ती भोसरी येथे व्यायामशाळा चालविली जाते. सिध्देश्वर युवा क्रांती मित्र मंडळ, धावडेवस्ती यांनी मनपाची धावडेवस्ती व्यायामशाळा ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत मागणी केलेली आहे. तरी मनपाची धावडेवस्ती व्यायामशाळा, सिध्देश्वर युवा क्रांती मित्र मंडळ, धावडेवस्ती यांना ११ महिने कराराने दर महा र.रु.२,०००/- मनपाकडून सेवाशुल्क देऊन सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६५ विषय क्रमांक – ०७

दिनांक - ११/०७/२०१६

सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.जितेंद्र ननवरे

संदर्भ : मा.तानाजी खाडे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड मनपाच्यावतीने साई शारदा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, कासारवाडी येथे मनपाची साई शारदा महिला व्यायामशाळा कासारवाडी, पुणे ही व्यायामशाळा चालविली जाते. सदर व्यायामशाळा हिंदवी मित्र मंडळ, कासारवाडी यांना मनपा अटी शर्तीनुसार ११ महिने कराराने दर महा र.रु.२,०००/- मनपाकडून सेवाशुल्क देऊन सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेस मान्यता

देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६६ विषय क्रमांक – ०८

दिनांक - ११/०७/२०१६

सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.जितेंद्र ननवरे

संदर्भ : मा.तानाजी खाडे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड मनपाच्यावतीने पुनावळे येथे व्यायामशाळा चालविली जाते. सदर व्यायामशाळा सम्राट अशोक विचार मंच ट्रस्ट, पुनावळे वस्ती, पुनावळे यांना मनपा अटी शर्तीनुसार ११ महिने कराराने दर महा र.रु.२,०००/- मनपाकडून सेवाशुल्क देऊन सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **मासुळकर समीर मोरेश्वर** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३६९/२०१६
दिनांक : १२/०७/२०१६ चे लगत.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.